# कवी गिरीश

प्रा. सुबोध जोशी

गिरीश या टोपणनावाने काव्यलेखन करणारे शंकर केशव कानेटकर हे मूळचे रहिमतपूरचे. त्यांचे शालेय शिक्षण सातारच्या 'न्यू इंग्लिश स्कूल' आणि पुण्याच्या 'न्यू इंग्लिश स्कूल'मध्ये झाले. एम. ए. पदवी प्राप्त झाल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजचे प्राध्यापक म्हणून काम केले. त्यानंतर पुण्यातील अहिल्यादेवी हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणूनही काम केले. १९४० ते १९५४ पर्यंत ते सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. १९५५ पासून ते फलटण येथे मुधोजी हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करीत होते. ४ डिसेंबर १९९४ मध्ये गिरीशांचे निधन झाले. सुमारे १४ वर्षे त्यांनी सांगलीत व्यतीत केली. म्हणूनच त्यांना सांगलीचे कवी म्हणता येईल.

ज्या काळात गिरीश कविता लिहू लागले, त्या काळात केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज, भा. रा. तांबे यांच्या काव्याचा फार मोठा प्रभाव मराठी कवितेवर होता. गिरीश हेही या प्रभावापासून मुक्त नव्हते. १९११ मध्ये त्यांची पहिली कविता 'नदीकाठचा सायंकाळचा देखावा' 'करमणूक' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. तेव्हांपासून त्यांनी काव्यनिर्मितीस सुरुवात केली. गिरीश यांची वाङ्मयीन जडणघडण, खऱ्या अर्थाने १९२३ मध्ये स्थापन झालेल्या रविकिरण मंडळाच्या अनेकविध कार्यक्रमाने, उपक्रमांनी झाली. गिरीश या मंडळाचे ज्येष्ठ सदस्य होते. माधव ज्यूलियन (माधव त्र्यंबक पटवर्धन), यशवंत (यशवंत दिनकर पेंढारकर) श्री. बा. रानडे, द. ल. गोखले, ग. त्र्यं. माडखोलकर, दिवाकर (शंकर काशिनाथ गर्गे) हे अन्य सदस्य होते. हे सर्व सदस्य कवी, लेखक, समीक्षक असल्याने त्यांच्याबरोबर होणाऱ्या चर्चा, वादविवाद यामुळे गिरीशांचे वाडमयीन जीवन समृध्द झाले. टेनिसन या इंग्रजी कवीचाही प्रभाव त्यांच्या काव्यावर दिसून येतो.

१९११ ते १९२० या काळात गिरीशांच्या कविता 'करमणूक' 'उद्यान' 'मनोरंजन' 'काव्य रत्नावली' या नियतकालिकातून प्रसिद्ध झाल्या. गिरीशांचे प्रकाशित स्फुट काव्यसंग्रह म्हणजे 'वीणा झंकार' 'कांचनमेघ' 'मानसमेघ' 'चंद्रलेखा' 'कांचनगंगा' 'सोनरी चांदणे' 'फलभर' हे आहेत. 'वीणाझंकार' या काव्यसंग्रहात गिरीश आणि यशवंत यांच्या कविता समाविष्ट आहेत. गिरीशांची बहुते सर्व काव्यसंग्रह रविकिरण मंडळानेच प्रकाशित केले. गिरीश यांना मराठीतील खंडकाव्याचे प्रवर्तक मानले जाते. त्यांचे 'अभागी कमल' (१९२३) हे मराठीतील पहिले सामाजिक खंडकाव्य आहे. या व्यतिरिक्त त्यांनी 'कला'(१९२६), 'आंबराई' (१९२८) अशी दोन खंडकाव्ये लिहिली. त्यांचे 'अनिकेत' हे खंडकाव्य टेनिसनच्या एनोच एर्डन याचे शब्दश: भाषांतर आहे.

अन्य रविकिरणमंडळाच्या सदस्य कवी प्रमाणे गिरीशांनी प्रेम कविताही लिहिल्या. प्रेमभावनाही ते हळुवारपणे व्यक्त करतात. संयम हा त्यांच्या काव्य लेखनाचा स्थायीभाव आहे. प्रासंगिक आणि कुटुंबविषयक कविता ते अधिक उत्कटपणे लिहितात. गिरीशांच्या निसर्ग कवितेवर बालकवींच्या निसर्ग कवितांचा प्रभाव जाणवतो. त्यांचे 'निसर्ग संगीत' हे १२० ओळींचे दीर्घकाव्य विशेष उल्लेखनीय आहे. गिरीश यांनी राष्ट्रीय भावना व्यक्त करणाऱ्या कविता लिहिल्या तसेच 'आगगाडी' सारख्या अप्रतिम बालकविताही लिहिल्या.

गिरीश यांनी सुनीत, उद्देशिका, गीत, अभंग असे अनेक काव्यप्रकार हाताळले. त्यांची भाषा अलंकृत नाही, पांडित्यपूर्ण नाही, साधी, सोपी, सुंदर, घोटीव मधूर आहे. केशवसुतांच्या 'तुतारी' मधला आवेश त्यामध्ये नसला तरी त्यामध्ये रसमयता आहे. श्री. भ. श्री. पंडित यांनी लिहिले आहे, 'त्यांच्या कल्पना कातीव आहेत. शब्द सोलीव आहेत, रचना रेखीव आहे आणि भाषा घासून पुसून कमावलेली आहे.' गेयता हे त्यांच्या काव्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य

आहे. स्वत: गिरीश यांनी काव्यगायन करून मराठी कविता वाचकांपर्यंत पोचविलेली होती. काव्यमनाची परंपरा यशवंत कवीप्रमाणेच गिरीश कवींनी सुरु केली.

आजच्या वाचकांना गिरीश यांच्या जानपद कविता आकर्षित कतील. अशा प्रकारच्या कवितेत त्यांनी ग्रामीण भागातील शेतकरी, गुराखी, धनगर, मेंढपाळ, यांचे सुरेख चित्र रेखाटले आहे. 'भलरी' सारख्या कवितेत त्यांनी पिकाच्या कापणीचे वास्तवदर्शी वर्णन केले आहे. जानपदभाषा कवितेत वापरण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. गरीब शेतकऱ्याबद्दल कळवला त्यांनी अशा कवितात व्यक्त केला आहे. एका कवितेत ते लिहितात–

निवली राने, गुरे वासरे
निवली झाडे, रानपाखरे
धनी अन्तरी निवले सारे
शेतकऱ्यांच्या पोटामधला निवेल कधी पण जाळ?

गिरीशांचे वाड्मयीन बलस्थान त्यांच्या सामाजिक आशयाने समृध्द असलेल्या खंडकाव्यात आहे. 'अभागी कमल' (१९२८) हे त्यांचे खंडकाव्य एका विधवा युवतीची शोककथा आहे. कृष्णाकाठी असलेल्या गावात घडलेली ही सत्य कथा आहे. 'साळी' जातीत लिहिलेले 'आमराई' हे खंडकाव्य ग्रामीण भागात राहणाऱ्या व्यसनासन्न माणसाने आपल्या संसाराची केलेली वाताहत आणि त्याच्याच बायकोने आपल्या सोशिकतेने साकारलेला संसार या विषयावर आहे. 'कला' या खंडकाव्यात त्यांनी प्रेमात पडलेल्या परंतु भिन्न जातीमुळे प्रेमाचे रुपांतर विवाहात न झाल्यामुळे आयुष्याची फरफट झालेल्या युवक युवतीचे चित्रण आहे.

आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात गिरीश यांनी आपले परममित्र माधव ज्यूलियन यांचे चरित्र 'स्वप्नभूमी' या नावाने लिहिले. माधव ज्यूलियन यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल त्यांनी लिहिलेच, त्याशिवाय त्यांच्या 'वरदा' या युवतीबरोबर असलेल्या तथाकथित प्रेमप्रकरणाबद्दल लिहून त्यांनी हे प्रकरण त्यांच्यावरील कलंक नव्हता हे दाखवून दिले. गिरीश यांचा 'काव्यकला' हा टीकात्मक गद्य लेखसंग्रह आणि 'मराठी नाट्यछटा' हा नाट्यछटेवरील प्रबंध प्रकाशित झाले आहेत. 'अमृत' या काव्यकृतीत त्यांनी स्वत:च्या आयुष्यातील घटनांचा उल्लेख केला आहे. याशिवाय 'कमंडलूचा ओढा' हे ५६० पानांचे आत्मचरित्र (प्रकाशित) आहे.